**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.**

**दिनांक 29.07.2010 रोजी (दि.26.07.2010 रोजीची तहकूब सभा) संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

गुरूवार दिनांक 29 जुलै 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी 11.30 वाजता **वंदेमातरम्** या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.खान आगा मीयॉ
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**विषय क्र. 18 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2010-2011 या वर्षीचे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.नासेर खान | :अर्थसंकल्पाची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आलेली असतांना सभागृहात अधिकारी उपस्थितीत नाही. |
| श्री.जगदिश सिध्द | :अधिकारी बैठकीस उपस्थित नाही बैठक तहकूब करण्यात यावी. |

श्री.अमित भुईगळ :अत्यंत महत्वपूर्ण बैठक आहे. अर्थसंकल्पाची बैठक असतांनाही अधिकारी उपस्थित नाही.

श्री.विकास जैन :सर्व अधिकारी उपस्थित राहण्याकरीता सभा दहा मिनीटांसाठी तहकूब करण्यात यावी.

मा.सभापती :सभा दहा मिनीटांसाठी तहकूब करण्यात येते. वेळ 11.40 वा. व सभा सुरू वेळ दूपारी 11.55 वाजता.

मा.सभापती :वसुलीबाबत चर्चा करण्यात यावी.

श्री.महेश माळवतकर :महानगरपालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत जकात, पाणीपट्टी, मालमत्ता कर व इतर विभागातुन असते. नगर सेवक म्हणुन निवडून आल्यावर वार्डातील विकास कामे (विद्युत, ड्रेनेज, पाईप लाईन, उद्यान) झाली पाहिजे या उद्देशाने तेथील जनता निवडून देत असते. परंतु गेल्या दोन ते तीन वर्षापासुन उत्पन्न व खर्च यातील तफावत वाढत चालली आहे. महानगरपालिकेतील वसुली विभाग हा सक्षम आहे काय? वर्षानुवर्ष वसुली केली जात नाही परंतु बजेट करतांना कामे ठेवली जातात. निधी अभावी आत्ता असंख्य कामे रद्द केली आहेत. अत्यावश्यक कामांनाही मनपाकडे निधी नाही. वसुली करीता जे अधिकारी नेमलेले आहेत वार्ड वाईज सर्व यंत्रणा काम करीत आहे. परंतु प्रत्यक्षात वसुली होत नाही. शहरात रस्त्यांचे पॅचवर्क करण्यासाठी निधी नाही याबाबतची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने वसुली करीता कुठल्या उपाययोजना केल्यात याचा खुलासा करण्यात यावा. गेल्या 10 वर्षापासुन स्पिल वाढत आहे. कुठल्या कायद्याअंतर्गत स्पिल ओव्हरचे कामे रद्द केली. वसुली न केल्यामुळे विकास कामांना फटका बसत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :अदांजपत्रकाच्या पान नंबर आर 6 वर साधारणत: 40 टक्के वाढ सुचविलेली आहे. झाडे व फुले विक्रीसाठी 3/4 कपात सुचविलेली आहे. तसेच आर-11 या पानावर जमीन महसुली व बिगर शेतसारा अनुदानमध्ये सन 2009-10 मध्ये 17 ते 18 लाख रूपये असतांना मा.आयुक्तांनी अंदाजामध्ये दहा कोटींची तरतुद ठेवलेली आहे. पान नं.12 वर पशुसंवर्धन विभाग सन 2009-10 मध्ये 10 लाख रूपये प्राप्त झाले होते. यावेळी काहीच ठेवलेले नाही. त्याच प्रमाणे भांडवली जमा मध्ये मा.आयुक्तांचे अंदाज कमी कमी का केले. पान नं.18 वर ठेकेदाराकडुन अनामत रक्कम सन 2009-10 मध्ये 4.50 कोटी रूपयांची यावर्षी फक्त 1 कोटी दाखविण्यात आलेली आहे. आर 19 पानावर इतर अनामत जमा 2009-10 मध्ये 4 कोटी 7 लाखाची तरतुद होती यावर्षी फक्त 2 लाख रूपये दाखविलेले आहे. वसुलीसाठी 4 कोटी खर्च केला जातो परंतु वसुली किती टक्के होते याचा कुठल्याही पानावर उल्लेख नाही. कशाच्या आधारे वसुली करणार आहे. याबाबीचा उल्लेख नाही. साफसफाईसाठी सन 2009-10 मध्ये 20 कोटी खर्च केले आहे. यावर्षी 21.5 कोटी खर्च केले आहे. रॅम्केला साफसफाईचे कंत्राट दिलेले आहे. आरसीएच मध्ये 2009-10 मध्ये 2 लाख रूपये ठेवण्यात आले होते तो खर्च झ ाला आहे. यावर्षी 1 कोटी रूपये ठेवण्यात आले. कशासाठी ठेवण्यात आले याचा बोध होत नाही. E-28 मध्ये सन 2009-10, 31 जुलै पर्यंत जन्म मृत्युची नोंदच झाली नाही. अशा पध्दतीचे शुन्य टक्के बजेट आहे. सहाव्या वेतन आयोगासंदर्भात

प्रशासनाची भुमिका तसेच बजेटमध्ये याबाबतीत उल्लेख नाही. सहाव्या वेतन आयोगाबाबत शुन्य टक्के तरतूद ठेवण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांचा विमा काढण्यात आला होता त्याचे हप्ते भरणा करणार होतो. त्याचीही तरतुद नाही मग कर्मचाऱ्यांचे विमा सुरक्षीत राहणार आहे किंवा नाही. याबाबत साशंकता आहे. विद्युत दुरूस्ती, शिफ्टींग यासाठी तरतुद नाही. नाला साफसफाई, उद्यान यास तरतुद शुन्य आहे. साफसफाईचे साहित्य खदेरीसाठी 25 लाख रूपये ठेवलेले आहे साफसफाईचे काम रॅम्के कंपणीस दिलेले असतांना सदरची तरतुद कशासाठी केलेली आहे. बिल्डर माफियांनी मनपाचे अनेक भुखंड बळकावलेले आहे. असे असतांना भुखंडाचे सरंक्षण करण्यासाठी मनपाने भरीव तरतुद केलेली नाही. शहरात अनेक ठिकाणी भुखंड मोकळे आहेत अनेक भुखंडाचे केसचा निर्णय मनपाच्या बाजुने लागलेला आहे. तरीही अद्याप पर्यंत संरक्षीत भिंत टाकु शकलेलो नाही. याचा विचार होणे अपेक्षीत आहे. वार्ड वाईज तक्तेमध्ये वार्ड अ ला 10 कोटी रूपये व इतर वार्डांना 5 कोटींची तरतुद ठेवण्यात आली आहे हि तफावत कशासाठी पाणीपुरवठा देखभाल दुरूस्ती सहा कोटी रूपये ठेवण्यात आलेला आहे. सन 2007 ते 2009 पर्यंत शुन्य होता. समांतर जलवाहिनी सारखा मोठा प्रकल्प हाती घेत असतांना एवढी मोठी रक्कम कशासाठी खर्च करायची. नाला, ड्रेनेज दुरूस्तीसाठी ड वार्डासाठी फक्त 60.75 लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. वार्ड ड मध्ये बिजली नगर भागातुन आठ वर्षापुर्वी नाला, ड्रेनेज दुरूस्तीसाठी 30 ते 35 हजार रूपये भरून घेतलेले आहे परंतु त्या ठिकाणी कुठलेही काम झालेले नाही. वार्ड ड ची वसुली जास्त, तरतुदी कमी. अशा तरतुदी का ठेवण्यात आल्यात? वसुलीत मालमत्तापोटी 45 कोटी वसुल होणार आहे. जकात 134 कोटी, पाणीपट्टी 39 कोटी वसुलीचे प्रशासनाचे अंदाज आहे. डिमांड किती आहे. सविस्तर खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :प्रशासनाने कर वसुली बाबतीत मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा की, रिसिप्ट किती प्रपोज केली होती आणि किती जमा झाली.

श्री.महेश माळवतकर :शहरातील सहा प्रभागात मालमत्ता कर किती अपेक्षीत होता आणि किती आला.

श्री.मधुकर सावंत :मा.आयुक्तांनी वसुली संदर्भात अनेक बैठका घेण्यात आल्या त्याचा प्रभागातील वसुलीवर परिणाम झाला आहे काय?

श्रीमती साधना सुरडकर:मालमत्ता कर 45 कोटी रूपये वसुली दाखविलेली आहे ती यंदाच्या वर्षीची आहे की, थकबाकीसह वसुली दाखविलेली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :सन 2009-10 ची रिसिप्ट किती होती आणि वसुली किती झाली याचा खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार महापालिकेच्या वसुलीमध्ये सातत्याने वाढ होण्याकरीता उपाययोजना केलेल्या आहेत.

श्री.महेश माळवतकर :न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत आहे. जी वसुली होणारच नाही याबाबतीतही माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : मनपामध्ये 6 ऑगष्ट 2009 रोजी रूजू झालेलो आहे. त्यानंतर विविध उपाययोजना हाती घेतलेल्या आहेत. गेल्यावर्षी विधानसभा, लोकसभा,

महानगरपालिका निवडणुक यासाठी मनपाची सर्व यंत्रणा लागल्यामुळे वसुलीवर परिणाम जाणवलेला आहे. सन 2009-10 रोजी मालमत्ताची मागणी 48,22,34615/- रूपये होती वार्ड अ- 4 कोटी 58 लक्ष वार्ड ब-14 कोटी 43 लक्ष वार्ड क- 3 कोटी 57 लक्ष, वार्ड ड- 9 कोटी 1 लक्ष, वार्ड इ- 7 कोटी 67 लक्ष, वार्ड फ- 8 कोटी 92 लक्ष. सन 2009-10 मध्ये जी वसुली झाली 30 कोटी 2 लक्ष वसुल करू शकलो टक्केवारी मध्ये एकुण 63 टक्के मालमत्तेची वसुली होते. 2008-09 च्या तुलनेत 3.50 कोटींची जास्त वसुली केलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सन 2009-10 मध्ये मा.आयुक्तांनी केलेल्या अंदाजाबाबत माहिती देण्यता यावी. यावर्षीचे 45 कोटी कमी आहे किंवा जास्त आहे. तेच कमी असल्यामुळे वसुली वाढविण्याचा, एनआरव्ही वाढविण्याचा, टॅक्स वाढविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मागच्या वर्षी प्रशासनाचे अंदाज काय होते. त्याप्रमाणे यावर्षीचे बजेट झाले आहे का? यावर्षीचे बजेट चुकीचे आहे का? की मागच्या वर्षीचे बजेट चुकीचे आहे खुलासा करण्यात यावा.

श्री.महेश माळवतकर :झोन वाईज वसुलीची माहिती देण्यात यावी. सन 2010-11मध्ये स्पिल ओव्हरमध्ये किती रक्कम ठेवली याबाबतीतील तफावतची माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : वसुली पुढील प्रमाणे आहे. वार्ड अ- मागणी 4 कोटी 58 लक्ष वसुली- 2 कोटी 73 लक्ष, 60 टक्के, वार्ड ब- मागणी 14 कोटी 43 लक्ष वसुली- 6 कोटी 72 लक्ष, 47 टक्के, वार्ड क- मागणी 3 कोटी 57 लक्ष, वसुली- 1 कोटी 72 लक्ष, 49 टक्के, वार्ड ड- मागणी 9 कोटी 1 लक्ष, वसुली- 7 कोटी 25 लक्ष, 81 टक्के, वार्ड इ- मागणी 7 कोटी 67 लक्ष, वसुली- 3 कोटी 51 लक्ष, 46 टक्के, वार्ड फ- मागणी 8 कोटी 92 लक्ष, वसुली- 8 कोटी 1 लक्ष, 90.32 टक्के.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मालमत्ता करामध्ये सर्वसाधारण कर, लाभकर 1 प्रमाणे 1.32 याचा अर्थ संपूर्ण मालमत्ताची एनआरव्ही 1 कोटी 25 लाख रूपये दाखविलेली आहे. याचा अर्थ संपूर्ण मालमत्ताची एनआरव्ही 1 कोटी ठरते. नियमानुसार सर्वसाधारण कर 25 टक्के. 1 कोटी 25 लाख प्रशासनाने कसे दाखविले आहे. खुलासा करण्यात यावा. एनआरव्ही प्रमाणे टॅक्स लावण्यात येतो का, वेगळया नियमाप्रमाणे टॅक्स लावलेले आहे. खुलासा करण्यात यावा. तफावत काय आहे.

मा.सभापती :सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :यावर्षीची आणि मागील वर्षीची जी तरतुद दाखविण्यात आलेली आहे. संबधीत विभागाशी चर्चा करून त्यांनी जे आकडे दिलेले असतात तेच मुळ अंदाजपत्रकात घेतलेले असतात. उत्पन्न व खर्चाचे आकडे संबधीत विभागाकडुन घेण्यात येतात.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्या वर्षी डिमांड 48 कोटीची होती यावर्षी 45 कोटीची आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:यावर्षी वसुली वाढली ती कशी. 45 कोटींच्या उद्देशाबाबत माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी :याबाबतीत विभागप्रमुखच माहिती देऊ शकतात.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : स.सदस्यांने विचारलेल्या प्रश्नानुसार महानगरपालिकेची मालमत्ताची मागणी हि निश्चित स्वरूपाची असते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:मागणी एनआरव्ही प्रमाणे आहे काय खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : निश्चित स्वरूपाची याचा अर्थ एखादया करदात्याकडुन मिळकतदात्याकडुन किती रूपये येणे हे निश्चित ठरलेले असते. त्यामुळे मागणीची जी रक्कम आहे ती फिक्स असते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सदरची रक्कम कशावरून ठरते खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात मालमत्ता वाढत नाही असे प्रशासनाचे मत आहे काय ?

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : प्रशासनाचे असे मत नाही व असे म्हणने नाही.

श्री.विकास जैन :मागील दहा वर्षाचे मालमत्तेपोटी फक्त 45 कोटी येणे बाकी आहे ?

श्री.रेणुकादास वैद्य :मागील वर्षी डिमांड 48 कोटी रूपये होती यावर्षी डिमांड किती आहे.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : डिमांड कमी झालेली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :या वर्षीची डिमांड किती आहे.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : यावर्षीची डिमांड 52 कोटींची आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :बजेटमध्ये याबाबतीतचा उल्लेख केलेला नाही.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : बजेटमध्ये उल्लेख करत नाही. 45 कोटींचा वसुलीचा अंदाज आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सर्वसाधारण कर 52 कोटी 36 लाख दाखविलेला आहे. ते बरोबर आहे का? प्रशासनाने चुकीची माहिती दाखविलेले आहे यास जबाबदार कोण? सन 2009-10ची मालमत्ता कराचे उद्दिष्ट 40 कोटी 26 लाख आहे एनआरव्ही 36 कोटी 50 लाख दाखविलेली आहे. बरोबर आहे का?

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : महानगरपालिकेच्या मालमत्ताची एनआरव्ही ठरविणे हा वेगळा विषय आहे. मालमत्ता कर आकारतो तो एनआरव्ही बेस असतो. बजेटमध्ये याचा उल्लेख करत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार: जे बजेट ठेवलेले आहे ते विना एनआरव्ही ठेवलेले आहे का? बजेट हे बंद खोलीमध्ये तयार केलेले आहे. मालमत्ताचे 45 कोटी बरोबर आहे का?

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : 45 कोटीचे वसुलीचे उद्दिष्ट आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मागच्या वर्षी प्रशासनाचे अंदाज काय होता, प्रशासनाचे अंदाज बरोबर आहे का? ईआरपीवर दोन कोटी रूपये खर्च करण्यात आलेला आहे परंतु ईआरपीची एकही संचिका तयार करण्यात आलेली नाही. किमान 2 फाईल्स दाखवा.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : महानगरपालिकेच्या मालमत्तांचे कर आकारणी करत असतांना त्या मालमत्तेच्या क्षेत्रफळावरती, त्याच्या वापर, इमारतीच्या वयावर आकरणी केली जाते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:45 कोटी दाखविण्यात आलेली आहे त्यात एनआरव्ही किती आहे आणि ती बरोबर आहे काय?

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : 45 कोटी ही एनआरव्ही नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 45 कोटी ही मालमत्ता सर्वसाधारण कर आहे का?

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : सर्व करांचा समावेश आहे. 45 कोटी ही एकुण कराची मागणी आहे.

श्री.विकास जैन :सर्वसाधारण कर 26 कोटी एवढे देणे शहरामध्ये आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार:प्रशासनाने जकातीचे 134 कोटी रूपये दाखविण्यात आलेले आहे ते बरोबर आहे काय?

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : प्रत्यक्षात ठेका 138 कोटींचा दिलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:टेंडरचा कालावधी किती महिण्यांचा आहे.

उपआयुक्त(म.) / क.नि. व सं. : सदरचे अंदाजपत्रक हे वार्षिक अंदाजपत्रक आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:प्रत्यक्षात जकातीचे 103 कोटी येणे आहे. प्रशासनान कुठल्याही प्रश्नाचा खुलासा देवु शकत नाही. यावर्षीचे अंदाजपत्रक बंदखोलीमध्ये तयार करण्यात आलेले आहे.

श्री.अमित भुईगळ :मनपामध्ये चार उपआयुक्तांपैकी मा.आयुक्त साहेबांकडे एक उपआयुक्त देण्यात यावे व तीन उपआयुक्तांना वार्डामध्ये वसुलीसाठी पाठविण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:उपआयुक्तांना वसुलीकरीता पाठविण्यात यावे. बजेटमध्ये आकडे बरोबर नाही आणि प्रशासनाने अंदाजपत्रकास रियलीस्टीक बजेट म्हणुन संबोधले आहे.

श्री.विकास जैन :वसुलीचा आकडा जवळपास 52 कोटींचा प्रशासनाने खुलासा केलेला आहे परंतु प्रत्यक्षात तो आकडा 80 ते 90 कोटींचा आहे.

श्री.अमित भुईगळ :प्रशासन सक्षम नसल्यामुळे दैनिक लोकमत वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. प्रशासनाने संबधीत अधिकाऱ्याचा निषेध करावा आणि संबधीत वर्तमानपत्राचाही निषेध करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार: रियलीस्टीक बजेट म्हणजे काय 134 कोटी आणले कोठून प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सुर्यकांत जायभाये : तीन्ही उपआयुक्तांना मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बंदी घालण्यात यावे. संबधीत अधिकारी यांना वसुलीकरीता वार्डामध्ये पाठविण्यात यावे. व्यावसायिक नळ कनेक्शनची वसुली करण्यात यावी. व्यावसायिक नळ कनेक्शनची संख्या शहरात मोठयाप्रमाणात आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : MSEB चे व्यावसायिक मिटर किती आहे याची माहिती संबधीत विभागास आहे परंतु मनपाला व्यावसायिक नळ कनेक्शन किती आहे याची माहिती नाही. मा.आयुक्तांनी बऱ्याचवेळा बाबा पेट्रोलपंप ते विमानतळापर्यतच्या व्यावसायिक नळ कनेक्शनवर कारवाईच्या सुचना केलेल्या आहेत. परंतु संबधीत अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यवाही केलेली नाही. शहरात फक्त एकहजार उद्योगधंदे आहेत.अशी माहिती/ अहवाल शासनास केंद्र शासनास द्यावा लागेल. जालना येथे 8200 उद्योगधंदे आहेत.

मा.सभापती :प्रशासनाकडून योग्य खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:मुख्यालयात उपआयुक्त यांना बंदी घालण्यात यावी. वसूलीला पाठवा.

मा.सभापती :स.सदस्यांच्या भावनानुसार एक उपआयुक्त मुख्यालयात तर तीन उपआयुक्तांनी दोन प्रभाग याप्रमाणात वसुलीसाठी वाटप करून द्यावे. तीन्ही उपआयुक्तांनी अत्यावश्यक कामांसाठी मुख्यालयात यावे. नेमलेल्या प्रभागामध्ये कार्यरत राहून वसुली करण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:दहा हजारांच्या वर थकबाकी ज्यांच्याकडे आहे त्यांचेकडे उपआयुक्तांनी समक्ष भेट देऊन वसुलीसाठी प्रयत्न करावा.

मा.सभापती :एक रूपयांपासून ते एकलाख रूपयांपर्यंत अधिकार देण्यात यावा आणि स्वाक्षरीसाठी मुख्यालयात येतील. जागच्या जागी निर्णय घेण्यात यावा. एक लाखाच्या वरती असेल, तर स्थायी समितीसमोर आणण्यात यावे. वसुलीवर

उपआयुक्त यांनी लक्ष केंद्रित करावे. प्रशासनाचा प्रशासनावर खर्च वाढत चालला आहे त्यावर नियंत्रण असावे. उपआयुक्त हे मनपाच्या सुविधा घेण्यासाठी मनपामध्ये येतात.

श्री.विकास जैन :दोन प्रभाग सोडल्यास चार प्रभांगाची वसुली 50 टक्के सुध्दा नाही. 45 कोटी पैकी या टक्केवारीनुसार बघीतल्यास 25 ते 30 कोटीच वसुली होती याचा परिणाम विकास कामांवर होतो.

मा.सभापती : वसुली संदर्भात मा.आयुक्तांनी दर आठ दिवसांत उपआयुक्त यांच्याकडुन अहवाल घेण्यात यावा. स्थायी समितीच्या प्रत्येक बैठकीमध्ये सर्व स.सदस्यांपर्यंत अहवालाची माहिती दिली पाहिजे. स्लम, गुंठेवारी भागात नळकनेक्शन कपात करू नये. व्यावसायिक नळ कनेक्शन किती आहे. मालमत्ता किती आहे याबाबतची माहिती काढुन वसुली कशा प्रमाणात करण्यात येईल याचा मार्ग काढण्यात यावा. ज्यांच्याकडे कर बाकी आहे त्यांच्याकडुन विचारणाकरून त्यांचे समाधान करून वसुली करण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ :मनपाने शहरात पार्किंगव्यवस्था सुरू केल्यास मनपाच्या तिजोरीत लाखो रूपये येतील. होर्डिंगचे गेल्या सातवर्षापासून पैसे थकीत आहे. नविन निवीदा काढण्यात याव्यात. सेल ॲडस् पुणे येथे 107 कोटी रूपये टॅक्स देतात परंतु औरंगाबादमध्ये एक वर्षाचे पैसे दिलेले आहे. 75 लाख रूपये बाकी आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:एक वर्षाची परवानगी काढतात व वर्षानुवर्ष होर्डींग लावले जाते.

मा.सभापती :सेल ॲडचा गोपनिय अहवाल, खुलासा प्रशासनाकडे आलेला आहे वाचुन दाखविण्यात यावा. त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे खुलासा करण्यात यावा. सेलॲड बाबत नविन निवीदा काढण्याच्या सूचना करण्यात आल्याहोत्या त्याबाबत माहिती देण्यात यावी. सेलॲडमध्ये सर्व अधिकारी यांचेवर ताशेरे ओढलेले आहे. अहवाल वाचुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

श्री.जगदिश सिध्द :बजेटमध्ये मालमत्ता,नळ कनेक्शन,व्यावसायिक नळ कनेक्शन किती आहे यांचा उल्लेख नाही.

मुख्य लेखापरिक्षक :मा.आयुक्तांच्या आदेशानुसार चौकशी अहवाल तयार करण्यात आलेला आहे. शहरात जाहिरात फलके, ॲडपोस्ट, होर्डिंग लावण्यासंदर्भात मनपाने दिनांक 08.10.2003 रोजी मे.सेलॲड एजन्सीला मान्यता दिलेली होती. त्यानुसार 252 होर्डिंग, 1500 केऑक्स व 500 ॲडपोस्ट लावण्यास मान्यता देऊन मा.आयुक्त यांनी दिनांक 03.06.2010 रोजी चौकशी करण्याचे आदेशीत केलेले होते. त्यानुसार या चौकशी संदर्भामध्ये निष्कर्ष काढण्यात आले ते खालील प्रमाणे.

1. सेलॲड्स कडून मा.लवादाच्या निर्णयानुसार रक्कम 52,41,346 रूपये 9 टक्के व्याजासह वसुल करावे. असा मा.लवादाने निर्णय दिलेला होता. तद्वतच सन 2008-09 व सन 2009-10 मध्ये लावलेल्या जाहिरातीची रक्कम निश्चित करून ती देखील वसुल करणे आवश्यक आहे.
2. जाहिरात कराराची मुदत संपल्यामुळे नविन निवीदा त्वरीत काढुन जाहिरातीचे काम त्वरीत देणे जेणेकरून मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.

3. सदरील संचिका खुप काळ प्रलंबित राहिल्याबद्दल,व संबधीताचा खुलासा घेऊन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : निवीदा काढण्याचे त्वरीत आदेश देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :होर्डिंगच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत अनेक सदस्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत. सर्वसाधारण सभेत रूलिंग देण्यात आल्या होत्या की, या अनाधिकृत सर्व होर्डींग काढण्यात याव्यात. व नव्याने टेंडर काढण्यात याव्यात परंतु कुठलीच कार्यवाही झालेली नाही. आजपासून अनाधिकृत होर्डींग काढण्यात येवुन नविन निवीदा काढण्यात याव्यात.

मा.सभापती :आठवडी बाजारासंबधी (टेंडरसंबधी) प्रशासनाने खुलासा करावा. मा.सर्वसाधारण सभेमध्ये अनाधिकृत होर्डींगचा विषय ठेवण्यात आला होता. ताबडतोब नविन निवीदा काढण्यात याव्यात. अनाधिकृत होर्डिंग तात्काळ काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. स्थायी समितीच्या प्रत्येक बैठकीत अहवाल सादर करण्यात यावा. सेल अॅड संबंधी जे जबाबदार आहेत, त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्यासंबधी अहवाल मा.स्थायी समितीसामोर मांडण्यात यावा.

श्री.जगदिश सिध्द :शहरात मालमत्ता किती, नळ जोडणी किती, याबाबतची प्रशासनाकडे माहिती नाही.

मा.सभापती :प्रशासनाने शहरात किती नळ कनेक्शन आहे मालमत्तांना व्यवस्थितरित्या कर लावण्यात आलेले आहे किंवा नाही. याची माहिती प्रशासनाने माहित करावी. ज्यावेळेस सुधारीत अर्थसंकल्प तयार होईल त्यामध्ये मनपाची मालमत्ता किती आहे. घरगुती, व्यावसायिक नळ कनेक्शन किती आहे. या बाबतचा तपशिल अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मनपाकडे स्वतःच्या असलेल्या मालमत्तांची माहिती नाही. अर्थसंकल्पामध्ये मनपाच्या मालमत्ता, मालमत्ता संबधी न्यायालयीन प्रकरणे, मालमत्तांची सध्याची परिस्थिती, मनपाच्या मालमत्ताच्या ठिकाणी इतरांनी कार्यालय टाकलेत का? या सर्व बाबींची माहितीसाठी कार्यवाहीसाठी एखाद्या सक्षम अधिकाऱ्याकडे मनपाच्या नावांवर मालमत्ता करण्याची जबाबदारी सोपविण्यात यावी.

मा.सभापती :कडबा मार्केट मनपाच्या नांवावर आहे का? खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :क्रांतीचौक भागात कोट्ट्यावधी रूपयांची जमीन आहे त्यास मनपाने संरक्षण भिंत बांधलेली आहे. मनपाने न्यायालयीन प्रक्रीया जिंकलेली आहे. मागील पाच वर्षापासून महानगरपालिकेचे नांव लावण्यासंबधी फॉलोअप सुरू आहे. अनेकवेळा पत्र दिलेली आहेत. अद्यापर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. हि दुर्देवी बाब आहे.

श्री.मधुकर सावंत :मालमत्ता विभाग सक्षम असला पाहिजे. विधी विभाग आणि मालमत्ता विभाग एकत्र करण्यात यावे.

श्री.विकास जैन :माझ्या वार्डात महानगरपालिकेने लेआऊट करून लोकांना जागा देण्यात आली आहे. नगर रचना विभागाच्या अधिकारी यांनी खुलासा करावा. महानगरपालिकेची

जागेचा लेआऊट करून लोकांना पीआर कार्ड करून देवू शकतो काय? खुलासा घेण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.विभागीय आयुक्त यांना भेटुन पत्र देण्यात आले होते. दिल्ली गेट येथे ॲग्रीकल्चर विभागाची जागा आहे त्यास लागुन मनपाची जागा आहे. मनपाच्या अभियंत्याने गुंठेवारीमध्ये नियमित केली.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.विकास जैन :प्रशासन पुर्ण माहितीसह आलेले नसल्यामुळे सभा तहकूब करण्यात यावी. आपल्यामार्फत फक्त प्रश्न विचारले जात आहे. परंतु खुलासा मिळत नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त :ADTP उच्च न्यायालयात कामाकरिता गेलेले आहे.

श्री.विकास जैन :एक महिना झाला आहे मा.आयुक्तांनी लिहीले आहे परंतु आज पर्यंत कुणीही काहीही कार्यवाही केलेली नाही. मनपाने प्लॉटिंग केलेले आहे. एखाद्या नागरीकाने प्लॉटिंग केल्यास त्यावर कारवाई होते.

कार्य.अभियंता (बीओटी सेल) : वेदांत नगर येथे जे ओपन स्पेस आहे. रिझर्व साईट आहे त्याठिकाणी सन 1983-84 मध्ये ले आऊट करून दिल्लीगेट येथील लोकांना जागा देण्यात आलेली आहे. पी.आर. कार्डवर नांव आलेले आहे.

श्री.विकास जैन :सन 1983-84 मध्ये तो ले आऊट नव्हता.

कार्य.अभियंता (बीओटी सेल) :त्या लोकांची नांवे आलेले आहेत.

श्री.विकास जैन :ते योग्य आहे काय? नियमानुसार प्लॉटिंग करू शकतो काय?

कार्य.अभियंता (बीओटी सेल) :पीआर कार्डवर त्या लोकांचे नांवे आलेले आहे.

श्री.विकास जैन :जे केलेले आहे ते योग्य आहे काय?

कार्य.अभियंता (बीओटी सेल) :लिगली त्याची शहानिशा करावी लागेल.

श्री.विकास जैन : पब्लीक पर्पजसाठी आहे. ले आऊट करू शकतो काय?

कार्य.अभियंता (बीओटी सेल) :मा.सभापती यांना उद्देशुन सांगण्यात यावे. Please address to Hon. Chairman.

श्री.विकास जैन :कुठल्या नियमात झाले आहे. सेमी पब्लीक झोन आहे. संबधीत अधिकारी यांचेवर कारवाई होत नाही तोपर्यंत सभा चालणार नाही.

मा.सभापती :स.सदस्यांचे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अधिकारी म्हणुन आपण उभे आहे. स.सदस्य प्रश्न विचारणा करीत असेल यात काही गैर नाही.

श्री.विकास जैन :मनपाने लेआऊट केलेला आहे तो नियमात बसतो काय? स.सदस्यांना असे बोलणे योग्य नाही.

श्री.मधुकर सावंत : अतिशय गंभीर बाब आहे.

श्री.विकास जैन :सर्वांनी सभेचा त्याग करावा.

श्री.मधुकर सावंत :हा सदर सदस्याचा अपमान नसुन सर्व सदस्यांचा अपमान आहे. अधिकाऱ्यांना तंबी द्या. संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : अधिकारी कुठल्याही प्रश्नाचे बरोबर उत्तर देत नाही.

श्री.महेश माळवतकर :सभागृहात शहरातील प्रश्न सोडविण्यासाठी आलेलो आहे.

(सर्व स.सदस्य संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यासाठी मागणी करतात.)

मा.आयुक्तांनी अतिशय कर्तव्यदक्षपणे छोटया छोटया गोष्टींवर अधिकारी/ कर्मचारी यांना निलंबीत केले जाते मग संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही का होत नाही. सभागृहात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती **:** अशा पध्दतीचे वागणे बोलणे योग्य नाही. सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता संबधीत अधिकारी यांनी सभागृहात माफी मागावी. तोपर्यत सभेचे कामकाज चालणार नाही.

(सर्व स.सदस्य सभा सोडुन सभागृहाबाहेर जातात)

सभेचे कामकाज 20 मिनीटानंतर सुरू होते.

श्री.मधुकर सावंत :सभागृहात अधिकारी यांनी चुकीचे वाक्य वापरून जे वातावरण तयार केले त्याबाबतीत मा.आयुक्तांनी कुठली कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा.

श्री.नासेर खान :मागील सर्वसाधारण सभेत सिल्लेखाना येथे प्रतिबंध करण्या संदर्भात श्री.नाईकवाडे, संचालक प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केलेला होता. मा.महापौर,मा.आयुक्त यांनी आश्वासन दिले होते की, काही भाग सोडुन कार्यवाही करण्यात येईल अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे. माझे मत विचारात न घेता निर्णय घेण्यात आला. मा.महापौर यांनी प्रस्ताव मंजूर केला. मा.आयुक्तांनी यातुन निर्णय काढला जाईल म्हणून सांगीतले होते. संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.मधुकर सावंत :मा.सर्वसाधारण सभेमध्ये संबधीत अधिकारी यांचेवर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.नासेर खान :सर्वसाधारण सभेच्या सभागृहात माझे मत विचारत घेतले नाही म्हणुन स्थायी समितीमध्ये मुद्दा मांडत आहे.

मा.आयुक्त :मा.सर्वसाधारण सभेत मा.महापौरांचा अधिकार असतो तो त्यांनी वापरला.

श्री.मधुकर सावंत :आजच्या घटने विषयी चर्चा करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :जी घटना घडली आहे बैठकीत वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे. कामकाजामध्ये अडथळा निर्माण हि दुर्देवी बाब आहे. सभागृहास विनंती आहे की, संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.सिकंदर अली : माझी कोणत्याही स.सदस्याची भावना दुखविण्याचा हेतु नव्हता. कुठल्या स.सदस्याची भावना दुखावली असल्यास मी दिलगीरी व्यक्त करतो.

श्री.रेणुकादास वैद्य :गंभीर प्रकार असतांना दिलगीरी व्यक्त करणे योग्य नाही. आजच्या कामकाजामध्ये संबधीत अधिकारी यांना सहभागी करण्यात येवु नये. त्यांच्या संदर्भाने जी माहिती हवी असेल ती संबधीत दुसऱ्या अधिकारी यांच्यावर जबाबदारी टाकून, संबधीत अधिकारी यांना सभागृहाबाहेर जाण्यास सांगावे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी जो खुलासा केला आहे तो समाधानकारक नसल्याने संबधीत अधिकारी यांनी आजच्या कामकाजापुरते बाहेर जावे. स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त :सर्वसाधारण सभेत जो ठराव ठेवण्यात आला होता. ठरावाच्या अनुषंगाने जी चर्चा झाली आणि जो निर्णय झाला तो तपासण्यात येत आहे आणि योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नासेर खान :मा.महापौरांनी निर्णय दिला होता की, मा.आयुक्त व मी आपण बसुन सर्वे करून निर्णय घेऊ. सर्वसाधारण सभेत मंजूरी झालेली आहे.

मा.आयुक्त :बैठक झालेली नाही. बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.नासेर खान :अधिकारी हे वार्ड अधिकारी स.सदस्य यांना अंधारात ठेवुन ठराव मांडला जातो.

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहे.

श्री.नासेर खान :एका अधिकारी यांना माफी मागण्यास सांगण्यात येते तर दुसऱ्या अधिकारी यांनी गुन्हा केलेला आहे त्यांनीही सभागृहाची माफी मागावी व बाहेर जावे.

मा.सभापती :यानंतर अशा प्रकारचे वर्तन करणाऱ्या अधिकारी यांचेवर कडक कार्यवाही करण्यात येईल.

श्री.जगदिश सिध्द :सध्या स्थितीत शहरात किती मालमत्ता आहे. व्यवसायीक नळ कनेक्शन, घरगुती नळ कनेक्शन, बांधकाम परवाने, भाजी मंडई, तलाव, चित्रपट गृह, मंगल कार्यालय, मटन मार्केट, कोंडवाडा या सर्व बाबींची माहिती अर्थसंकल्पात देण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :स.सदस्यांची जी माहिती विषयी चर्चा केली आहे त्याविषयी अर्थसंकल्पात कुठेही उल्लेख केलेला नाही. ती सर्व माहिती अर्थसंकल्पात दिली गेली पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील मालमत्तांचा उल्लेख असने आवश्यक होते परंतु तसा उल्लेख झालेला नाही. LDC बेटरमेंन्ट चार्जेस् किती वर्ष झाले आहे त्यात वाढ केलेली नाही वाढ केली असतीतर मनपाच्या उत्पन्नात वाढ झाली असती. खुलासा करण्यात यावा.

उपअभि.(न.र.) श्री.देशमुख :LDC, CBC सन 1992 रोजी औरंगाबाद शहरास लागु झाली. तेव्हा पासून वाढ झालेली नाही. कर वाढी संदर्भात प्रस्ताव मांडलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सन 1992 पासुन मनपाच्या उत्पन्नात किती वाढ झाली असती याचा गांभियाने विचार करावा. लाखो रूपयांची कमाई बिल्डर करतात कर वाढवले का जात नाही.

श्री.विकास जैन :वाढ किती केली आहे.

उपअभि.(न.र.) श्री.देशमुख : दिड पट वाढ केली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सन 1992 पासून कर वाढीचा प्रस्ताव सभागृहात का आला नाही. मनपाचे आर्थीक नुकसान झालेले आहे याची जबाबदारी कुणाची आहे.

श्री.विकास जैन :वेदांत नगर ले आऊटचा खुलासा करण्यात यावा.

उपअभि.(न.र.) श्री.देशमुख : दिल्ली गेट येथील अतिक्रमण काढुन तेथील लोकांना वेदांत नगर येथे पर्यायी जागा दिली होती. संचिका मागविण्यात आली आहे 15 मिनिटांत खुलासा सादर करेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सन 2009-10च्या बजेटमध्ये गरीब लोकांसाठी 5 कोटी 85 लाख रूपये Poor बजेट ठेवण्यात आले होते. गरीबांसाठी मनपाचे किती पैसे खर्च केले याचा खुलासा करण्यात यावा.

मुख्य लेखाधिकारी :सन 2010-11 चा जो अर्थसंकल्प सादर केला त्यात Poor बजेट सादर केलेले आहे. यापुर्वी Poor बजेट स्वतंत्ररित्या सादर केलेले नव्हते. तथापी प्रत्येक

बजेटमध्ये वार्डनिहाय स्लमसाठी ज्या योजना घेतलेल्या आहे त्याचा खर्च वार्डनिहाय घेतलेला आहे. एकत्रित घेण्यात आलेला नाही. वार्ड निहाय खर्चाची एकत्रित माहिती थोडयाच वेळात सादर करण्यात येईल.

श्री.महेश माळवतकर : किती मालमत्ता आहे, ज्याची वसुलीच होणार नाही असा आकडा प्रशासन सादर करू शकतो काय? न्यायालयीन प्रविष्ट प्रकरणे याबाबतची माहिती देण्यात यावी. मालमत्ता कर आणि पाणीपट्टी किती खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी :मालमत्ता,पाणीपट्टी संदर्भातील आकडे बजेटमध्ये दाखविण्यात आले आहे ते विभागाने जे आकडे दाखविण्यात आले आहे ते दिलेले आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणे, न होणारी वसुली हि संबधीत विभागाकडून माहिती प्राप्त होईल.

श्री.महेश माळवतकर :बजेट करतांना वसुली होणार नाही त्याचाही समावेश होतो व त्यानुसार विकास कामे ठरविली जातात परंतु न होणाऱ्या वसुलीच्या रक्कमेचा समावेश यात होत असल्याने त्याचा फटका विकास कामांना होतो. वसुली संदर्भात प्रत्यक्षात होणारी वसुलीचा आकडा सभागृहासमोर आला पाहिजे.

मुख्यलेखाधिकारी : मालमत्ता करांसंदर्भात 49 ते 50 टक्के वसुली आहे.

श्री.महेश माळवतकर :50 टक्केच वसुली होते, वसुली वाढत का नाही. हडको सिडकोमध्ये पाणीपट्टीची भरणा न केल्यास नळ कनेक्शन कापले जाते. परंतु वर्षानुवर्ष कर भरणा न करणाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही होत नाही. रूपये दहा हजारांच्या वर ज्यांची मालमत्ता, पाणीपट्टी कर बाकी आहे त्यांच्यावर कारवाई होत नाही. प्रशासनाची कारवाई फक्त गरिब नागरिकांपुरतीच का मर्यादित असते.

श्री.विकास जैन :वसुलीचे टार्गेट आपण ठरवत असतो. वसुली कमी झाल्यास संबधीत अधिकारी यांचेवर कोणती कार्यवाही होते. कमी वसुलीचा परिणाम विकास कामांना होतो. 2 प्रभागात चांगली वसुली, बुक टारगेट वेगळे, 46, 47 % झाले, त्यांचेवर आपण काय करतो. ज्याची वसुली कमी विकास कामे कमी करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :वसुली संदर्भात मनपातील अधिकारी कर्मचारी यांच्याकडुन सुरुवात करायला पाहिजे. अधिकारी कर्मचारी यांच्या पगारातुन मालमत्ता, पाणीपट्टी कराची वसुली करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :प्रशासनाचा खर्च 35 टक्क्यांच्या वर आहे या खर्चात कपात करण्यात यावी जेणे करून विकास कामांवर खर्च करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सन 2009मध्ये विविध विकास कामांना स्थायी समितीने अनुदान मंजूर केले होते कलम 102 नुसार सर्व अनुदान खर्च न झाल्यास पुढील दोन वर्षासाठी पुढील अंदाजपत्रकात समावेश करण्यासाठी मंजूरी देण्यात येते. परंतु प्रशासनाने पुर्वीची सर्व कामे रद्द केलेली आहे. 10 ते 20 लाखाची कामे स्थायी समितीने मंजूर केल्यानंतर सर्वसाधारण सभेने ठराव घेऊन प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. अशी सर्व कामे प्रशासनाने कुठल्या कायद्यान्वये रद्द केलेली आहे. खुलासा करण्यात यावा. रद्द करण्याबाबतचा शासन निर्णय दाखविण्यात यावा.

श्री.विकास जैन :रद्द हया शब्दा ऐवजी स्थगित हा शब्द वापरण्यात आलेला होता.

श्री.रेणुकादास वैद्य :स्पिल ओव्हरची कामे करतांना प्रशासनाने कुठलाही कॅटेरिया ठेवलेला नाही. कुणाच्या आदेशाने सदरील कामे रद्द करण्यात आली.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:पैसे नसल्याकारणाने वर्क ऑर्डर झालेली कामे रद्द केली म्हणून शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात यावे.

श्री.जगदिश सिध्द :सदरील कामांना प्रशासनाने मंजूरी दिली का पदाधिकारी यांनी मंजूरी दिलेली आहे.

श्री.विजय वाघचौरे :एकच काम चार वार्डामध्ये दिलेले आहे.याचा खुलासा करण्यात यावा. वार्ड ड आणि वार्ड ड मध्ये तेच काम दाखवले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:वार्डासाठी जे पाच कोटी रूपयांचे बजेट ठेवण्यात आलेले आहे त्यावर विचार करण्यात यावे. एकच काम दुसऱ्या ठिकाणीही दाखविले जाते. स.नगरसेवकांचे कामाबाबत पत्र घेण्यात यावे. पुर्वी जे कामे अशा प्रकारचे झालेले आहेत त्याची चौकशी करण्यात यावी. माझ्या वॉर्डात मेनहोत आहे. फक्त ढापे आहेत.

श्री. विजय वाघचौरे :एकच काम चार वार्डात कसे खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन : फ मध्ये दोन ठिकाणी झाले.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :बजेटबुकमध्ये एखाद्या कामाचे रिपीटेशन झाले असेल. विभागाकडून सॉफ्ट कॉपी घेण्यात आलेली आहे. सिडीमधुन माहिती घेतलेली आहे. लेखा विभागात टाईपिंग झालेली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :यामुळे बजेटचे आकडे वाढलेले आहे. आकडे चुकलेले आहेत याबाबतची जबाबदारी कुणावर आहे. वार्ड अ,ब,क,ड, मध्ये एकच काम सर्व वार्डामध्ये आहेत. चार वॉर्डातून देयके काढणार का.

श्री.महेश माळवतकर :बिल निघालेल्या कामाचे बजेटमध्ये उल्लेख झालेला आहे का. याची माहिती देण्यात यावी. बील निघाले असेल, तर येण्याचे कारण काय?

मुख्यलेखाधिकारी :स्पिलची कामाची यादी किंवा इतर कामांची यादी ही संबधीत विभागाकडून सॉफ्ट कॉपी घेण्यात आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : स्पील म्हणजे काय.

श्री.महेश माळवतकर :सदरील विभाग महानगरपालिकेच्या अख्यत्यारित आहे का बाहेर आहे.

श्री.अमित भुईगळ :श्री.सोनी, माजी शहर अभियंता यांच्या कार्यकाळात पाणीपुरवठा,विद्युत या सर्वांची जबाबदारी एकाच अभियंत्याकडे देण्यात आलेली होती परंतु आता दोन वार्ड एका कार्यकारी अभियंता यांचेकडे जबाबदारी सोपविल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पुर्वी प्रमाणेच सिस्टीम असायला हवी. सर्व शहर अभियंता यांचे अंडरमध्ये होते.

श्री.मधुकर सावंत :पुर्वी एका अधिकाऱ्याकडे एकाच कामाचे वाटप होते परंतु आता वार्ड निहाय वाटप केल्यामुळे ड्रेनेज,लाईट,पाणीपुरवठा अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पुर्वीप्रमाणे शहर अभियंता यांच्या अधिपत्याखाली इतर कार्यकारी अभियंता यांना देण्यात यावे. पुर्वी प्रमाणे सिस्टीम करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :समजा संबधीत विभागास नाला साफ करण्यास सांगितले असता वार्ड ड मधुन सांगण्यात येते संबधीत भाग वार्ड फ मध्ये येतो आणि फ मधून सांगण्यात येते वार्ड ड मध्ये सदरील भाग येतो. विर सावरकर चौक येथील नाल्याची स्थिती अशाच प्रकारची झाली आहे.

श्री.अमित भुईगळ :स.सदस्य यांचे म्हणने अतिशय योग्य आहे. मी मा.आयुक्तांना सि.पी. म्हणुन उल्लेख करतो कारण मनपाची परिस्थिती अशाच प्रकारची झाली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :याचे एकत्रिकरण करणे गरजेचे आहे. पाणीपुरवठा, ड्रेनेजच्या बाबतीत अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. छोटया छोटया कामांसाठी ड्रेनेज, वॉटर दुरूस्ती कामास फार अडचणी येतात. एका विभागासाठी एकच हेड ठेवण्यात यावे.

श्री.अमित भुईगळ :तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे.

मा.सभापती :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता पुर्वीप्रमाणे जी वार्डाची रचना होती. त्याप्रमाणे करण्यात यावे. यामध्ये नगरसेवकांची गैरसोय होत आहे. अधिकारी यांनी पोलीस स्टेशनप्रमाणे कामासाठी एक हद्द ठरवुन घेतलेली आहे. स.नगरसेवकांना लाईट,ड्रेनेज,रोड यांचे काम कोण पहात आहे याची माहिती पाहिजे. पुर्वीप्रमाणे सिस्टीम करण्यात यावी. तसेच महानगरपालिकेत शहर अभियंता आहे किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा. महानगरपालिकेने डिफर पेमेंटवर जे ठेके दिलेले आहे. प्रत्येक वार्डसाठी एक कोटी रूपये ठेवण्यात आलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कुठले लाईट चालू आहे. खुलासा घेण्यात यावा. लाईटचा गोंधळ आहे. एजन्सीकडून काम बंद करा.

मा.सभापती :लाईटच्या प्रश्नाबाबत एकही नगरसवेक समाधानी नाही. संबधीत विभागाच्या अधिकारी यांना विचारणा केली असता कंत्राटदाराचे नांव सांगण्यात येते त्यास विचारणा केली असता साहित्य नाही, पैसे नाही म्हणुन सांगण्यात येते.

श्री.विजय वाघचौरे :ठेकेदाराचे प्रकार दोन आहेत. ज्यावेळेस एक ठेकेदार लाईट चालु करायला येतो. त्याच्या बाजुचा पोलवरील लाईट दुसऱ्या ठेकेदाराकडे असतो. कुठल्या ठेकेदाराकडून काम करून घ्यावे हे सांगण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:आजच्या आज सदरील एजन्सीकडून कामे काढून घेण्यात यावी.

श्री.नासेर खान :मा.सर्वसाधारण सभेमध्ये लाईटचा मुद्दा उपस्थित केल्यावर दुसऱ्या दिवशी लाईट सुरू करण्याची कार्यवाही झाली परंतु आज पुन्हा पुर्वीप्रमाणे स्थिती झाली आहे. एक दिवसच लाईट सुरू झाले. पुन्हा बंद झाले.

मा.सभापती : चौकशी करण्यात यावी. चौकशी अहवाल स्थायी समितीस देण्यात यावा.

श्री.विकास जैन :पुर्वी अधिकाऱ्यांमार्फत कामे होत होती. सकाळी सात वाजता गाडी घेण्यासाठी यावे लागत होते.

श्री.नासेर खान :पुर्वी जबाबदारी फिक्स करण्यात आली होती परंतु आता वेगवेगळया जबाबदाऱ्या वाटप करण्यात आल्या आहेत.

मा.सभापती :बजेटमध्ये 50 लाख रूपये ठेवण्यात आलेले आहे. त्यातुन वार्ड वाईज एक वाहनाचे किंवा लाईटाची व्यवस्था वार्ड वाईज करण्यात यावी.

श्री.नासेर खान :सहा वार्डात सहा जेटिंग मशीन देण्याबाबत सूचना झाली होती खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :महानगरपालिकेत शहर अभियंता असेल तरच प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता :लाईटची सुविधा चांगल्या रितीने मिळावी या करीता सर्वोच्च सभागृहाने असा निर्णय घेतला होता वार्डमध्ये मुख्य रस्ते बीओटीकडे देण्यात यावे. त्यापध्दतीनेच विद्युत दुरूस्तीचे व इतर विद्युत विषयी कामे चालू आहेत.

श्री.अमित भुईगळ :काम समाधानकारक नाही ठेकेदाराकडून काम काढुन घेण्यात यावे.

श्री. विजय वाघचौरे :ॲग्रीमेंट किती दिवसांसाठी देण्यात आलेले आहे.

शहर अभियंता :विद्युत दुरूस्ती किंवा लाईट लावण्याचे जे काम आहे ते रोजचे काम दिलेले आहे. लाईट गेल्यास, नादुरूस्त झाल्यास लगेचच दुरूस्त करायला पाहिजे. एक दिवसांसाठी पाच हजारांच्या दंडाची कार्यवाही करण्यात आली आहे.

मा.सभापती :पाच हजारांचा दंड वसुल केल्यानंतर सुधारणा झाली का?

शहर अभियंता :सुधारणा झाली आहे.

श्री.महेश माळवतकर :ठेकेदाराला दुरूस्तीसाठी फोन केल्यास सांगण्यात येते की, मनपा बिल देत नाही. मग दंडात्मक कार्यवाही कशी केली. नाशिक येथील ठेकेदार साहित्य देत नाही म्हणुन सांगण्यात येते.

मा.सभापती :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रशासनाने तात्काळ सदरील एजन्सीचे कामे रद्द करण्यात यावी. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून कामे सुरू करण्यात यावे. महानगरपालिकेकडून कामे करण्यात यावी.
सभा तहकूब वेळ 2.00 वा. व सुरूवात 3.20 वा.

श्री.नासेर खान :लाईट दुरूस्तीसाठी मनपाकडे स्वत:ची वाहने असावी.

श्रीमती साधना सुरडकर:सौर उर्जेचे दिवे मनपातर्फे लावण्यात आलेले होते. आज त्याचे फक्त पोल उभे आहेत. खुल्या जागेत प्रायोगित तत्वावर लावण्यात आले होते खाजगी तत्वावर लावण्यात आलेले होते.

श्री.बनसोडे :सौर उर्जेवरती विविध ठिकाणी 100 ठिकाणी लाईटस् लावण्यात आले होते. लाईट लावून दिड वर्ष झाले आहे. तरतुद ठेवण्यात आली होती बजेटमध्ये आली नाही. तरतुद ठेवावी लागेल.

श्रीमती साधना सुरडकर:100 पैकी किती लाईटस् सुरू आहे.

श्री.बनसोडे :30 ते 40 लाईटस् चालु आहेत.

श्रीमती साधना सुरडकर:जे लाईट बंद आहेत ते वर्षापासून बंद स्थितीत आहे.

श्री.बनसोडे :तरतुद उपलब्ध नाही. बजेटमध्य तरतुद उपलब्ध झाल्यास कामे करता येईल.

श्री.विकास जैन :बजेटमध्ये वार्ड वाईज स्पिल वर्क व सन 2010-11 चे नविन तरतुद आहे प्रभाग अ ते फ च्या संदर्भात प्रशासनाने वसुली संदर्भात माहिती दिलेली आहे. स्पिलची किंवा नविन कामांची जी आखणी केलेली आहे. ती कशाच्या आधारे केलेले आहे ज्या प्रभागामध्ये वसुली जास्त आहे त्या प्रभागास जास्त वाव दिला पाहिजे. नविन कामांचा निष्कर्ष कसा लावण्यात आला खुलासा करण्यात यावा. जमा खर्च बॅलेंस असावा. आकडे खाली वरती झाले असावे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :स्पिल ओव्हर कामाचे 51 कोटी 20 लाख 73 हजार दर्शविण्यात आलेले आहे. लेखा विभागाकडे जे देयके प्रलंबित आहे त्याची यादी आहे त्यानुसार स्पिलमध्ये यादी दाखविण्यात आलेली आहे. देखभाल दुरूस्तीसाठी 32 कोटी 94 लाख नविन तरतुद ठेवलेली आहे. प्रत्येक वार्डास पाच कोटी रूपये ठेवण्यात आले आहे. स्पिल ओव्हरचे कामामुळे कमी जास्त तरतुदीमुळे 32 कोटीचा आकडा गेलेला आहे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :पाच कोटी रूपये ठेवण्याचा निर्णय कोणी घेतलेला आहे. |
| मुख्यलेखाधिकारी | :कमिटीने निर्णय घेतलेला आहे. मा.महापौर, मा.सभापती, मा. विरोधी पक्षनेता. |
| श्री.विकास जैन | :दुरूस्तीची आवश्यकता आहे. |
| मा.सभापती | :प्रभागातील वसुली नुसार तरतुद ठेवलेली आहे का की, प्रत्येक प्रभागात समान तरतुद ठेवलेली आहे खुलासा करण्यात यावा. |
| श्री.विकास जैन | :वार्ड ड मध्ये 81 टक्के वसुली झाली व तरतुद 11 कोटींची ठेवण्यात आली. वार्ड फ मध्ये 90 टक्के वसुली आहे परंतु तरतुद फ मध्ये सर्वात कमी ठेवण्यात आलेली आहे. |
| मुख्यलेखाधिकारी | :तरतुद ठेवतांना वसुलीचा निष्कर्ष ठेवण्यात आलेला नाही सर्व प्रभागांना समान न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. |
| मा.सभापती | :काय निकष लावले माहिती देण्यात यावी. |
| मुख्यलेखाधिकारी | :तरतुद समान वार्डांना समान वाटप केलेले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :एका वार्डास 11 कोटीची तरतुद व दुसऱ्या वार्डास 5 कोटीची तरतुद हि समान वाटप आहे का? |
| श्री.मधुकर सावंत | :ज्या वार्डातुन वसुली जास्त प्रमाणात होते त्या वार्डास अधिक तरतुद मिळायला हवी. जेनेकरून तेथील नागरीकांमध्ये चांगली भावना निर्माण होईल व ज्या वार्डात कमी वसुली आहे तीथे कमी निधी ठेवायला हवा जेणे करून त्यांच्यामध्ये कर भरणाची प्रवृत्ती निर्माण होईल. |
| श्री.विकास जैन | :सगळया प्रभागात सगळयाच प्रकारचे नागरीक वास्तव्यास आहे. |
| मा.सभापती | :ज्या प्रभागात वसुली जास्त आहे त्या ठिकाणी कामे जास्त होतात असा संदेश जाऊन मनपाची वसुली जास्त प्रमाणात होईल. तसेच वार्ड अधिकारीही वसुली जास्त करण्यासंदर्भात कार्यवाही करेल. ज्या प्रभागात चांगली वसुली आहे त्या प्रभागात जास्त कामे घेण्यात यावे. एमआयडीसीतील रस्त्यांची स्थिती खराब झालेली आहे. त्या ठिकाणी निकष काय लावणार आहे. |
| मुख्य लेखाधिकारी | :सभागृहाने आदेशीत केल्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. |
| श्री.मधुकर सावंत | :ज्या प्रभागात वसुली जास्त आहे त्या ठिकाणी कामाचे वाटप जास्त प्रमाणात करण्यात यावे तसेच ज्या ठिकाणी वसुली कमी प्रमाणात आहे तेथे वसुली वाढविण्याचे आदेश देण्यात यावे. |
| श्री.विकास जैन | :एका उपआयुक्तांना दोन प्रभाग याप्रमाणात वसुलीसाठी देण्यात यावे जेणे करून वसुली मोठया प्रमाणात होईल. प्रशासनामार्फत बातम्या लिक होत आहे हे योग्य नाही. |
| मा.सभापती | :अशी कुठलीही बातमी प्रेसला गेली नाही पाहिजे. |
| श्री.विकास जैन | :दुरूस्ती करून बजेटला मान्यता देण्यात यावी. |
| मा.सभापती | :वसुली संदर्भात बजेट ठेवण्यात यावे व ज्या प्रभागात कमी वसुली आहे त्या ठिकाणी अधिकाऱ्यांमार्फत टार्गेट वसुलीकरीता ज्या सुविधा लागेत त्या सुविधा प्रशासनाने द्यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :गेल्या पाच तासांपासुन बजेटवर चर्चा चालु आहे. बजेटमध्ये नविन विकास कामे शुन्य आहे. कुठल्याही स.नगरसेवकांच्या विकासकामांच्या याठिकाणी उल्लेख |

दिसत नाही. जुने स्पिल ओव्हरचे आकडे फक्त दाखविण्यात आलेले आहे. नविन तरतुदी दाखविण्यात आलेल्या नाही. शहराच्या विकासासाठी स.सदस्यांच्या वार्डातील विकासासाठी तरतुद ठेवावी लागणार आहे. तरतुद ठेवत असतांना कुठल्या आधारावर वसुलीवर तरतुद ठेवत आहे याचा खुलासा होणे अपेक्षीत आहे.

श्री.मधुकर सावंत :बजेटवर आमच्या तर्फे सर्व सदस्यां तर्फे मा.सभापती यांना सर्व अधिकार बहाल करतो. शहराच्या विकासासाठी चांगले बजेट सादर केले जावे.

श्री.विकास जैन :बजेटमध्ये कुठल्याच प्रभागामध्ये एक चांगले विकास काम दिसत नाही. प्रशासनास टार्गेट वाढुन देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वार्डातील वर्क ऑर्डर झालेले काम त्वरीत सुरू करण्यात यावे. असे आदेश देण्यात यावे. दुरूस्तीचे पुर्ण अधिकार सभागृहामार्फत मा.सभापती यांना देण्यात येत आहे. शहराचा सर्वांगीन विकास होईल अशा पध्दतीने तरतुद करावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

मा.सभापती :गेल्या पाच तासांपासून अर्थसंकल्पावर चर्चा चालू आहे. सर्व स.सदस्यांनी दुरूस्ती बजेट संदर्भात सहमती दर्शविलेली आहे त्याबाबत सर्व स.सदस्यांचे आभार व्यक्त करतो. प्रशासनातर्फे 301 कोटींचे बजेट सादर झालेले आहे. मालमत्ता विभागामध्ये इमारत भाडे, दुकाने भाडे व इतर मालमत्तांचे भाडे, जाहिरात भाडे यांचेकडून 100 टक्के भाडे वसुली पाहिजे परंतु ती वसुली होत नाही म्हणुन मालमत्ता विभागात 5 कोटींची दरवाढ सुचविण्यात येत आहे. नगर रचना विभागात मोबाईल टॉवरच्या कर वसुलीचा निर्णय घेतलेला आहे. त्यातुन जवळपास 5 ते 6 कोटींची वाढ अपेक्षीत आहे. म्हणून नगर रचना विभागात 5 कोटींची दरवाढ सुचविण्यात येत आहे. स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे जालना सारख्या शहरात 8400 व्यवसायिक नळ कनेक्शन आहेत परंतु औरंगाबाद शहरात फक्त 1100 व्यवसायिक नळ कनेक्शन आहेत. MSEB च्या धर्तीवर व्यवसायिक मिटर किती दिलेले आहे त्याची यादी मागविण्यात यावी. संबधीत अधिकारी आणि तीन्ही मा.उपआयुक्तांनी MSEB च्या यादीनुसार पहाणी तपासणी करून व्यवसायिक नळ कनेक्शनची माहिती घ्यावी त्यामुळे पाणीपट्टीमध्ये 3 ते 4 कोटींची वाढ सुचविण्यात येत आहे. मालमत्ता करांमध्ये 3 कोटींची वाढ सुचविण्यात येत आहे. प्रभाग कार्यालयांना 5 कोटींचे टार्गेट दिलेले आहे त्यात 50 % कपात करण्यात येत आहे 2 1/2 कोटींचेच राहतील त्यात संबधीत अधिकारी यांनी संबधीत वार्डाच्या नगरसेवकाचे पत्र घ्यायचे वार्डाच्या सभापती यांच्या सोबत बैठक घ्यावी व कामांबाबत विचारणा करून कामे करण्यात यावी, कामे मंजूर झाली पाहिजे. प्रशासनातर्फे 301 कोटींचे बजेट आहे त्यात वाढ करून बजेट 317 कोटींचे केले जात आहे. तत्कालिन आयुक्त मा.श्री.भोगे साहेब होते त्यावेळेस हरित औरंगाबादची संकल्पना केली होती. औरंगाबाद शहर ऐतिहासिक शहर आहे अजिंठा वेरूळ, घृष्णेश्वर मंदिर या सारखे जगप्रसिध्द वास्तु आहेत. पैठण येथील ज्ञानेश्वर उद्यान, जायकवाडी धरण आहे. औरंगाबाद शहर हे हरित झाले पाहिजे त्या करिता 5 कोटींची तरतुद ठेवण्यात येते. एमआयडीच्या

माध्यमातुन जकात व इतर माध्यमातुन उत्पन्न प्राप्त होते. परंतु तेथील रोडची अवस्था अत्यंत बिकट झालेली आहे म्हणुन किमान 3 कोटींची तरतुद बजेटमध्ये करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :स.सदस्यांचा स्वेच्छा निधी हा या वर्षी 7 लाख रूपये करण्यात यावा.

मा.सभापती :नियमाप्रमाणे करण्यात यावे, नगरसेवकांच्या निधीतील कामे त्वरीत चालु करण्यात यावी.

श्री.विजय वाघचौरे :गुंठेवारीसाठी किती तरतुद ठेवलेली आहे.

मा.सभापती :नगरोत्थान अंतर्गत 100 कोटी रूपये मिळणार आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पासाठी स.सदस्यांनी प्रशासनास ज्या सूचना, मत मांडले आहे त्या चांगल्या सूचना मांडलेल्या आहेत. त्याबाबत सर्वांचे आभार व्यक्त करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार सन 2010-2011 चे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यांत आले.

सन 2010-11 च्या मुळ अंदाजावर सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी अभ्यासपुर्वक सखोल चर्चा करून व केलेल्या सूचनांची दखल घेऊन मुळ अंदाज पत्रक रू.313 कोटी 38 लाख 85 हजार जमा यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.05 कोटी 26 लाख 92 हजार असे एकूण रू.318 कोटी 65 लाख 77 हजार जमेचा विचार करून खर्च रू.318 कोटी 46 लाख 15 हजार अपेक्षित धरता रू.19 लाख 62 हजाराच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येते. प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले सन 2010-11 चे मुळ अंदाजास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सभापती, स्थायी समिती व स.सदस्यांच्या सूचनेनुसार फेरफार व दुरूस्ती करून वरील प्रस्ताव फेरफार व दुरूस्तीसह मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.